# मेट्रो-३ मधील दोन स्थानकांसाठी ५१८ कोटी

मुंबई : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ मार्गातील दोन स्थानकांच्या बांधकामांसाठी ५१८ कोटी रुपयांच्या निधीला भारतीय विमानपत्तन आर्थिक नियामक प्राधिकरणाकडून मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे दोन स्थानकांच्या बांधकामाचा मार्ग मोकळा झाला आहे.

कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ मार्गासाठी छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने तीन भुयारी स्थानके प्रस्तावित केली आहेत. यात एक स्थानक स्थानिक विमानतळ (डोमेस्टीक), तर अन्य दोन स्थानके सहार रोड आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे प्रस्तावित आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन आणि मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेड यांच्यात १६ सप्टेंबर २०१५ रोजी एक सामंजस्य करार झाला. त्यानुसार एअरपोर्ट लिमिटेडने मेट्रो-३ स्थानकांच्या बांधकामांसाठी ७७७ कोटी रुपयांचा निधी देण्याचे मंजूर केले होते. सर्व आवश्यक प्रक्रियांची पूर्तता केल्यानंतर भारतीय विमानपतन आर्थिक नियामक प्राधिकरणाने मेट्रोतील दोन स्थानकांच्या बांधकामांसाठी निधी देण्याच्या प्रस्तावास मंजुरी दिली आहे. हा निधी स्थानिक विमानतळ आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे बांधण्यात येणाऱ्या स्थानकांसाठी असेल. यासाठी प्रवाशांकडून विकास शुल्क वसूल करण्यात येईल.

> यामुळे प्रकल्पास गती मिळणार आहे. भारतीय विमानपतन आर्थिक नियामक प्राधिकरणाने अतिशय सकारात्मक पाऊल उचलले आहे.
>
> – अश्विनी भिडे, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन-व्यवस्थापकीय संचालक